**L. A. BILL No. XXVI OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.

### महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

एचबी १०९८—१

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता ;

२०१७ चा महा. ६.

२०२१ चा महा. अध्या ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.
(२) तो, दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

२०१७ चा महा. ६.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०९ मधील,—

(१) पोट-कलम (३) मध्ये, खंड (घ) मधील तिस-या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

“परंतु आणखी असे की, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचा, अधिष्ठाता मंडळाकडून अर्जाची छाननी करणे व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याचा आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक २०२१ -२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी, वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतीलः—

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक | २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्यावर्षी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी. | ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (ग) | ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी. | ३१ डिसेंबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (घ) | लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी. | २८ फेब्रुवारी २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी.”; |

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (क) मधील विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईलः—

“परंतु, २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्याकरिता परवानगी मागणा-या व्यवस्थापनास, ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कुलसचिवाकडे अर्ज करता येईल.”.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृती.

२०२१ चा महा. अध्या. ८.

**३.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी १०९८—२ (८४०—१२-२०२१)

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (२०१७ चा महा.६) याच्या कलम १०९ मध्ये, नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्याकरिता परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये अशी तरतूद आहे की, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागणारे व्यवस्थापन, ज्यावर्षी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील. उक्त पोट-कलम (३) च्या खंड (ग) मध्ये अशी तरतूद आहे की, विहित केलेल्या कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अर्जांची, अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज, ज्यावर्षी असे अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाले असतील त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील. त्याच्या खंड (घ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल. त्याचप्रमाणे, कलम १०९ च्या पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये अशी तरतूद आहे की, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी कुलसचिवाकडे अर्ज करील.

२. कोविड-१९ वैश्विक साथरोगाच्या फैलावामुळे, नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा,अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यपद्धती, विहित कालावधीत पार पाडता येऊ शकली नाही आणि याकरिता, संबंधित शैक्षणिक वर्षासाठी, नवीन वेळापत्रक विनिर्दिष्ट करणे इष्ट आहे असे वाटले. या प्रयोजनासाठी,—

(क) उच्च शिक्षण विषयक नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचा दिनांक ;

(ख) अधिष्ठाता मंडळाने अर्जाची छाननी करण्याचा आणि व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने तो राज्य शासनाकडे पाठविण्याचा दिनांक ;

(ग) राज्य शासनाने इरादा पत्र देण्याचा दिनांक ; आणि

(घ) नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी मागण्यासाठी अर्ज करण्याचा दिनांक,

यांचे नवीन वेळापत्रक विनिर्दिष्ट करणेकरिता, उक्त कलम १०९ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. ८), प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१.

**उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक २६.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे)**

**(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)**

**१.** ते **१०८.** ** ** **

**१०९.** (१) व (२) ** ** ** नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम विषय विद्याशाखा तुकडी सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची कार्यपद्धती.

(३) (क) उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागणारे व्यवस्थापन, ज्यावर्षी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(ख) आवश्यक बाबींची पर्तता करतील आणि विहित कालावधीत प्राप्त होतील. केवळ असेच अर्ज विद्यापीठाकडून स्वीकारण्यात येतील आणि विचारात घेण्यात येतील.

(ग) विहित केलेल्या उपरोक्त कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जाची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज, ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील. विद्यापीठ, अर्जासोबत, व्यवस्थापन परिषदेला उचित वाटतील त्याप्रमाणे, संबद्ध कारणांनी यथोचितरित्या पुष्टी दिलेल्या आपल्या शिफारशी सादर करील ;

(घ) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जापैकी, राज्य शासनास, खडं (ग) अन्वये विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल. इरादा पत्र मागणा-या व्यवस्थापनाची योग्यता, उच्च शिक्षणाच्या परिसंस्थांच्या ठिकाणासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम इत्यादी प्रस्तुत घटक विचारात घेऊन, राज्य शासनास आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार योग्य व उचित वाटेल त्याप्रमाणे अशा परिसंस्थाना इरादा पत्र देता येईल. राज्य शासनाकडून विद्यापीठाला, या खंडामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी इरादा पत्राविषयी कळविण्यात येईल :

परंतु, अपवादात्मक प्रकरणामध्ये व कारणे लेखी नमूद करून, उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला इरादा पत्र देण्यासाठी, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जास राज्य शासनाकडून मान्यता देता येईल ;

“परंतु आणखी असे की, विद्यापीठास नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी मागणा-या अर्जावर निर्णय घेणे सोयीचे व्हावे यासाठी, या अधिनियमाच्या, प्रारंभाच्या लगतनंतरच्या पहिल्या शैक्षणिक वर्षासाठी यासोबतच्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) आणि (घ) यांमध्ये निर्देशिलेले दिनांक हे उक्त तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

**तक्ता**

| खंड (१) | विद्यमान तरतुदी मधील दिनांक (२) | २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता दिनांक (३) |
|---|---|---|
| (क) | वर्षाच्या सप्टेंबर महिन्याचा शेवटचा दिवस | १५ डिसेंबर २०१७ |
| (ग) | वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी | १५ जानेवारी २०१८ पूर्वी |
| (घ) | लगेच पुढच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी | २८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी. ” |

''परंतु आणखी असे की, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचा, अधिष्ठाता मंडळाकडून अर्जाची छाननी करणे व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याचा आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक, २०२०-२०२१ या वर्षासाठी, वाढविण्याच्या दृष्टीने, यातील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :-
-

| खंड | विद्यमान तरतुदी मध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक | २०२१-२२ या वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्यावी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी. | ३१ डिसेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (ग) | ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी. | २८ फेब्रुवारी २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (घ) | लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी. | १५ एप्रिल २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी.”; |

**(ङ)** ते **(छ)** ** ** **

(४) (क) नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदर वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील ;

“परंतु, २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाइट केंद्र सुरू करण्याकरिता परवानगी मागणा-या व्यवस्थापनास, ३१ डिसेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी कुलसचिवाकडे अर्ज करता येईल.”.

**(ख)** ते **(घ)** ** ** **

**(५)** ते **(९)** ** ** **

**११०.** ते **१४८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

****

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.]**

**[महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई